<u>रे. दिवाणी मुकदमा क्र. १९९/२०२० मधील निशाणी क्र.५ वरील आदेश</u>

(मनिषा मोरे व. वि कासाबाई पवार व.)

(CNR No. MHSN130007712020)

१. वादी क्र. १ व २ यांनी सदरचा दावा हा सरसनिरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. तर त्याअंतर्गत तुर्तातुर्त मनाई मिळणेकामी अर्ज सादर केलेला आहे.

२. वादी क्र. २ यांच्या म्हणण्याप्रमाणे कासाबाई ही त्यांची सवत असून तिच्या व कासाबाईच्या मुलीमुलींची नांवे सातबारापत्रकी नमूद आहेत. तरी त्यापैकी कुणाचेही हिस्से आजपर्यंत वाटपाद्वारे अलॉट करणेत आलेले नाहीत. प्रवादी क्र. १ ही तिचा मुलगा सुरेश याच्या मृत्यूमुळे सर्व मिळकती विक्री करणेच्या प्रयत्नात आहे. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रवादी क्र. १ ही तिच्या हिश्यापैकी जास्त क्षेत्र विक्री करु इच्छीते. त्यामुळे एकत्र कुटंबाची मिळकत परघराण्यात तबदिल होवू शकते तसेच बेकायदेशीररीत्या वादीच्या हिश्याची मिळकतपण विकली जावू शकते या कारणास्तव वादी यांनी एकतर्फी तुर्तातुर्त मनाई मिळणेकामी विनंती केलेली आहे. वादी यांनी सादर केलेले कागदपत्र व प्रतिज्ञापत्र पडताळून पाहिले असता दावा मिळकतींचे अजून वाटप झाले नसलेचे दिसून येते. अशा वेळी प्रवादी क्र. १ यांनी जर संपूर्ण मिळकत तबदिल केली तर निश्चितच वादीचे व दावा मिळकतीचे नुकसान संभवते. त्यामुळे एकतर्फी तुर्तातुर्त मनाई आदेशाद्वारे प्रवादी क्र. १ यांनी दावा मिळकत विक्री किंवा तबदिल करु नये म्हणून त्यांना २९/०१/२०२१ पर्यंत मनाई करणेत येते.

३. एकतर्फी तुर्तातुर्त मनाई आदेशाची नोटीस प्रवादी क्र. १ यांना देणेत यावी

ज्याची परताव्याची तारीख २९/०१/२०२१.

४. वादी यांनी सी.पी.सी ऑर्डर ३९ रुल ३ प्रमाणे पुर्तता करुन घ्यावी.

Digitally signed by Vijay Ramchandra Gharal
Date: 2020.12.30 11:27:08 +05'30'

कडेगांव (वि.रा. घराळ)

दिनांक – २९/१२/२०२० दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कडेगांव

I affirm that the contents of this P.D.F file order are same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : M.G. Buchade, (Grade III) |
| Court | : Civil Judge, Jr. Dn., & J.M.F.C., Kadegaon |
| Date | : 29/12/2020 |
| Order signed by the Presiding Officer on. | : 29/12/2020 |
| Order uploaded on | : 30/12/2020 |